**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**दिनांक :- २३/११/२०२१**

## मा. महासभा

**मा. महासभा सुचना क्र. ०६**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती ______________________**
**नगरसेवक / नगरसेविका,**
**मिराभाईंदरमहानगरपालिका**

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. महासभा बुधवार दि. ०१/१२/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०६ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

**मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.**

**(वासुदेव शिरवळकर)**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

### मा. महासभा बुधवार दि. ०१/१२/२०२१ सभा सुचना क्र. ०६

### विषयपत्रिका

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| -- | **प्रश्नोत्तरे -** |
| -- | **मागील सभांचे इतिवृत्तांत -** |
| ६० | दि. 30/03/2021, दि. 20/04/2021, दि. 19/05/2021 (दि. 20/04/2021 रोजीची तहकुब सभा) व दि. 23/06/2021 रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| -- | सर्व निवडणूका - निरंक |
| -- | सर्व नियुक्त्या - निरंक |
| -- | मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक |
| -- | विनंती अर्ज - निरंक |
| -- | सरकारी पत्रे - |
| -- | स्थायी परिवहन व विशेष समित्यांचे ठराव - |
| ६१ | शहरातील इमारतींना नळ जोडण्या बंद करण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे. |
| ६२ | शहरातील इमारतींमध्ये उभ्या राहणाऱ्या वाहनांच्या पार्कींग जागेवर कर आकारणी करणेच्या प्रशासनाच्या आदेशाबाबत धोरणात्मक निर्णय घेणे. |
| ६३ | घोडबंदर येथील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) यांचे असलेले गेस्ट हाऊस हस्तातरीत करणेबाबत. |
| ६४ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खेळांच्या मैदानांवर मुंबई क्रिकेट असोसिएशन माध्यमातून क्रिकेटसाठी खेळपट्टया तयार करुन प्रशिक्षण केंद्र सुरु करणेबाबत विचार विनिमय करणे. |
| ६५ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. 11 मधील इंदिरानगर येथील समाजमंदिराचे व व्यायामशाळेचे वांढीव बांधकाम करणेकामाच्या खर्चास प्रशासकीय आर्थिक मान्यता देणे. |
| ६६ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुख्य रस्त्यांवर पीपीपी (Public Private Partnership) तत्वावर दिशादर्शक फलक उभारणे कामाबाबत. |
| ६७ | रस्ते, चौक, वास्तु यांना नावे देणेबाबत. |
| ६८ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी पोकलन, चेन डोझर, मजूर पुरवठा करणे कामासाठी खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत. |
| ६९ | आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग) |
| ७० | पोलीस आयुक्त कार्यालयासाठी जागा हस्तांतर करणेबाबत. |
| ७१ | महापालिकेमार्फत करण्यात येणारा ट्राफीक वॉर्डन पुरवठा बंद करणेबाबत. |
| ७२ | शहरातील मैदाने, गार्डन, स्मशानभूमी, दुभाजके यांच्या देखभाल व निगा कामाच्या निविदेस अंदाजपत्रकात कामाकरीता तरतुद नसताना देयके अदा करण्यात आलेबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे. |
| ७३ | आकृतीबंधामध्ये मंजुर पदापेक्षा जास्त पदांवरील उपायुक्तांना शासनाच्या सेवेत वर्ग करुन महापालिकेतून कार्यमुक्त करणेबाबत निर्णय घेणे. |
| ७४ | मिरा भाईदर महानगरपालिकेच्या विविध विभागात निविदांची मुदत संपलेली असुनही नियमबाह्य मुदतवाढ देणे व मुदतवाढ नसतानाही देयक अदा केलेल्या संबंधीतांवर कारवाई करणेबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे. |
| ७५ | मिरा भाईदर महानगरपालिकेच्या नगररचना विभागातील अनामत रक्कमे बाबत विचार विनीमय करणे. |
| ७६ | आरक्षण क्र. 364 बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. |
| ७७ | महापालिकेच्या काही विभागात निविदा न काढता ठेका पध्दतीने मजुर व कर्मचारी घेणेकरीता ठराविक ठेकेदारांना प्रशासनाने चुकीच्या पध्दतीने मजुर व कर्मचारी पुरवठा करण्याचे कार्यादेश दिलेले आहेत, सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत निर्णय घेणे. |
| ७८ | परिवहन उपक्रमात कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणेकामी अवलंबिलेली पध्दत इतर विभागात नियुक्त करताना अवलंबिली जात नाही याबाबत विचार विनीमय करणे. |
| ७९ | कोविड कालावधीमध्ये मिरा भाईदर महानगरपालिकेतील काम केलेल्या कर्मचाऱ्यांना कोविड भत्ता देणेबाबत |

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- २३ नोव्हेंबर २०२१

# मिरा भाईदर महानगरपालिका

## मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. १/१२/२०२१ रोजी आयोजित केली आहे. सदर सभेकरीता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.

| |
|---|
| ३२. श्री. भगवती शर्मा मा. सदस्य यांनी दि. ०७/०९/२०२१ रोजी विचारलेला प्रश्न. |
| १) बांधकाम परवानगी वेळेस आकारणी करण्यात येणा-या मालमत्ता अनामत रक्कम या शिर्षाखाली सन २००९ पासुन ते मार्च २०२१ पर्यंत कोणकोणत्या विकासकाने किती किती रक्कमेची भरणा केलेला आहे. |
| अ) बांधकाम परवानगी वेळेस आकारणी करण्यात येणा-या मालमत्ता अनामत रक्कम या शिर्षाखाली सन २००९ पासुन ते मार्च २०२१ पर्यंत किती रक्कम जमा झालेली आहे. |
| ब) बांधकाम परवानगी वेळेस आकारणी करण्यात येणा-या मालमत्ता अनामत रक्कम या शिर्षाखाली सन २००९ पासुन ते मार्च २०२१ पर्यंत कोणकोणत्या विकासकाने अनामत रक्कमेचा परतावा मागितलेला आहे. |
| क) बांधकाम परवानगी वेळेस आकारणी करण्यात येणा-या मालमत्ता अनामत रक्कम या शिर्षाखाली सन २००९ पासुन ते मार्च २०२१ पर्यंत किती रक्कमेचा परतावा करण्यात आलेला आहे. |
| ड) बांधकाम परवानगी वेळेस आकारणी करण्यात येणा-या मालमत्ता अनामत रक्कम ही कोणत्या महापालिका अधिनियमानुसार रक्कम आकारण्यात येत असते. |
| इ) बांधकाम परवानगी वेळेस आकारणी करण्यात येणा-या मालमत्ता अनामत रक्कम या शिर्षाखाली सन २००९ पासुन ते मार्च २०२१ पर्यंत जमा झालेली अनामत रक्कम महापालिकेव्दारे कोणत्या नियमानुसार व कोणत्या विकास कामाकरीता खर्च करु शकते. |
| ई) महापालिका वार्षिक अंदाजपत्रकामध्ये कोणत्या लेखा शिर्षाखाली सदरची अनामत रक्कम दाखविण्यात येत असते. |
| उ) मनपाकडे जमा होणारी अनामत रक्कम परतावा मिळणेकरीता ठेकेदाराने मा.न्यायालयात दावा दाखल आलेला आहे किंवा कसे ? असल्यास त्याची माहिती देण्यात यावी. |
| ३३. श्री. भगवती शर्मा मा. सदस्य यांनी दि. ०७/१०/२०२१ रोजी विचारलेला प्रश्न. |
| १) मनपा आस्थापनेवर एकूण किती कर्मचारी कार्यरत आहेत व त्यांच्या वेतनावर मनपामार्फत किती खर्च करण्यात येत असतो याबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी. |
| अ) मनपा आस्थापनेवर कार्यरत कर्मचा-यांच्या वेतनावर शासनाने ठरविलेल्या धोरणानुसार ठराविक टक्क्यापर्यंत खर्च करण्यात येतो किंवा शासनाने ठरवून दिलेल्या धोरणापेक्षा जास्त प्रमाणात खर्च करण्यात येत असतो याबाबतची माहिती देण्यात यावी. |
| ब) मनपा आस्थापनेवर कार्यरत कर्मचा-यांच्या वेतन अदा करणेकरीता मनपामार्फत वार्षिक अर्थसंकल्पात वाढीव तरतुद करण्यात येत आहे किंवा कसे व वाढीव तरतुद केल्यास ती कोणात्या आधारे करण्यात येते याबाबतची माहिती देण्यात यावी. |
| क) शासनामार्फत मनपा आस्थापनेवर विविध वर्ग - १ पदाकरीता अधिका-यांची नियुक्ती करण्यात येत असते सदर अधिका-यांच्या वेतनावर मनपामार्फत किती खर्च करण्यात येत असतो याबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी. |
| ३४. श्री. भगवती शर्मा मा. सदस्य यांनी दि. ०७/१०/२०२१ रोजी विचारलेला प्रश्न. |
| १) सन २००२ ते आजपर्यंत एकूण किती अधिकारी / कर्मचारी यांच्यावर लाचलुचपत पथकामार्फत किती अधिकारी व कर्मचारी यांच्यावर गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आलेली आहे याबाबतची माहिती. |
| अ) लाचलुचपत पथकामार्फत किती अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणात्या स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्यात आलेला होता व त्यांना किती कालावधीकरीता निलंबित करण्यात आलेले होते याबाबतची माहिती. |
| ब) लाचलुचपत पथकामार्फत कारवाई करण्यात आलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना कोणत्या अटीशर्तीच्या अधीन राहून पुन:श्च मनपा सेवेत सामाऊन घेण्यात आले याबाबतची माहिती. |
| क) सदर अधिकारी / कर्मचारी हे सद्यस्थितीत मनपामध्ये कोणत्या पदावर कार्यरत आहेत व त्यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे किंवा कसे याबाबतची माहिती. |
| ड) मनपा सेवेत कार्यरत असणारे ज्या अधिकारी / कर्मचारी यांना विविध गुन्हाखाली लाच अथवा इतर अन्य विविध कारणास्तव मा.आयुक्त यांनी निलंबित केलेले अधिकारी व कर्मचारी यांची माहिती देण्यात यावी. |

इ) मनपा सेवेतील विविध आरोपाखाली मा.आयुक्त व मा.महासभेत ठराव पारित करुन निलंबित केलेले अधिकारी / कर्मचारी यांना कोणत्या गुन्हानुसार व किती कालावधीसाठी करण्यात आले तसेच सदर अधिकारी / कर्मचा-यांना कोणत्या आधारे कोणत्या अटीशर्तीच्या अधीन राहून पुन्हा मनपा सेवेत व कोणत्या पदावर सामाऊन घेण्यात आले याबाबतची माहिती.

ई) मा.आयुक्त यांनी व मा.महासभेत ठराव पारित करुन निलंबित केलेले अधिकारी / कर्मचारी यांना सद्यस्थितीत कोणत्या पदावर कार्यरत असून त्यांना पदोन्नती केव्हा देण्यात आलेली आहे किंवा कसे याबाबतची माहिती.

उ) लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत कारवाई झालेल्या अधिकारी तथा कर्मचारी यांचे प्रकरण न्यायप्रविष्ट असताना अशा अधिकारी तथा कर्मचारी यांना पदोन्नती देण्यात येऊ नये असे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश असून याबाबत राज्य शासनाने शासन निर्णय देखील जारी केलेला आहे या आदेशाचे पालन मिरा भाईंदर महानगरपालिकेने तंतोतंत केलेले असल्यास अथवा नसल्यास त्याची माहिती द्यावी. या आदेशाचे पालन केलेले नसल्यास सुधारीत फेर आदेश जारी करण्याबाबत प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती द्यावी.

३५. श्री. भगवती शर्मा मा. सदस्य यांनी दि. ०७/१०/२०२१ रोजी विचारलेला प्रश्न.

१) मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर ठेका पध्दतीने सन २००२ ते २०२१ या कालावधीत (प्रती वर्ष) विविध विभागा अंतर्गत ठेका पध्दतीने एकूण किती कर्मचारी कार्यरत करण्यात आलेले आहेत व त्यांच्या वेतनावर आजपर्यंतचा मनपामार्फत किती खर्च करण्यात आलेला होता? याबाबतची प्रतीवर्षनिहाय सविस्तर माहिती देण्यात यावी.

३७. श्री. अजित भ. पाटील मा. सदस्य यांनी दि. २६/१०/२०२१ रोजी विचारलेला प्रश्न.

१) शासनाच्या बहुतेक कार्यालयामध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती दिवशीच सर्व सेवानिवृत्तीचे लाभ मिळतात तशी तरतुद आहे. त्याप्रमाणे म.न.पा. सेवा निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा निवृत्तीच्या दिवशीच सर्व लाभ मिळावेत अशी मागणी नगरसेवक ह्यांनी दि. 07/09/2021 च्या दरम्यान केली आहे हे खरे आहे काय?

अ) असल्यास, ह्यापूर्वी कर्मचाऱ्यांना असे लाभ न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

ब) ह्या संदर्भात म.न.पा. प्रशासनाची भूमिका काय आहे? सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सर्व लाभ सेवा निवृत्तीच्या दिवशी देणेबाबत तत्सबंधीचा प्रशासकीय आदेश केव्हा काढण्यात येईल?

३८. श्री. अजित भ. पाटील मा. सदस्य यांनी दि. २९/१०/२०२१ रोजी विचारलेला प्रश्न.

१) म.न.पा. ने शहरातील उद्याने, मैदाने, स्मशानभूमी व दुभाजके निगा व देखभालीसाठी ठेकेदार नेमले आहे त्या कामापैकी नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान व प्रभाग समिती क्र.3 मधील आरक्षण क्र. 122क मैदान (सचिन तेंडूलकर मैदान) ह्यामधील अनावश्यक गवत काढणे, मैदानातील गवत कटींग करणे, फक्त ह्या कामापोटी एप्रिल 21 ते सप्टेंबर 21 ह्या कालावधीतील कामासाठी अनुक्रमे रु. 83,29,499/- व रु. 51,56,432/- इतकी रकमेची देयके अदा केलेली आहेत अशी शहरामध्ये चर्चा आहे हे खरे आहे काय?

अ) असल्यास, वस्तुस्थितीची माहिती होणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रत्येक मैदानातील एस्टीमेटमधील स्पेसिफिकेशननुसार प्रत्येक ॲटमवार झालेले काम, अदा केलेली रक्कम, महिनानिहाय तपशिलवार माहिती देण्यात यावी.

ब) MAC 1971 नियम 180 प्रमाणे ठेक्याच्या झालेल्या कामाची बाबनिहाय नोंदी मोजणी पुस्तकामध्ये (MAC 1971 नियम 136) घेण्याची तरतुद आहे. मोजणी पुस्तकातील नोंदी त्यातील दर (मुळ एस्टीमेट दराप्रमाणे आहेत किंवा नाही) तपासूनच देयके अदा करण्याची तरतुद आहे. मोजणी पुस्तकातील नोंदी तपासून देयके अदा केली आहेत किंवा कसे? मोजणी पुस्तकातील नोंदी कोणी तपासल्या आहेत?

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मिळकत विभाग

## मा.महासभा दि.०१/१२/2021

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (६३)** :- घोडबंदर येथील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) यांचे असलेले गेस्ट हाऊस हस्तांतरीत करणेबाबत..

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे.घोडबंदर येथे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) यांचे गेस्ट हाऊस आहे. सदर गेस्ट हाऊस मौजे.घोडबंदर सर्व्हे क्र.241 या जागेवर असुन त्याचे क्षेत्र 992 चौरस मिटर ऐवढे आहे. सदर गेस्ट हाऊसचा सध्या वापर होत नसल्याने सदर गेस्ट हाऊस इमारत महानगरपालिकेने हस्तांतर केल्यास सदर गेस्ट हाऊस इमारतीची दुरुस्ती करुन इमारत वापरात येऊन सुस्थितीत राहील या उद्देशाने गेस्ट हाऊस मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतर करण्यासाठी महामंडळाकडे पत्रव्यवहार करण्यात आला होता. तथापी महामंडळाच्या संचालक मंडळाने ठराव पारीत करुन सदर जागेच रेडीरेकनर दराप्रमाणे एक रकमी रु.2,58,21,760/- (अक्षरी रुपये दोन कोटी अठ्ठावन लक्ष एकवीस हजार सातशे साठ मात्र) महामंडळाकडे देण्यास सहमती असल्यास कळविणे करीता पत्र पाठविले आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत सदर गेस्ट हाऊस करणेसाठी रक्कम भरुन हस्तांतर करुन घेण्याबाबत निर्णय घेतल्यास सदर रक्कम भरणेसाठी अर्थसंकल्पात तरतुद करावी लागणार आहे. तरी सदर प्रस्तावाबाबत निर्णय होणेस शिफारस आहे.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

O/C

Pc-09/VP/2021-22/DK/MG-05

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मिळकत विभाग

## मा. महासभा दि.०७ /१२ /२०२१

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (६४)** :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खेळांच्या मैदानांवर मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या माध्यमातुन क्रिकेटसाठी खेळपट्या तयार करुन प्रशिक्षण केंद्र सुरु करणेबाबत विचार विनिमय करणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील क्रिकेटपटूंना प्रोत्साहन देण्यासाठी व चांगले क्रिकेटपट्टु निर्माण होणेकरीता शहरात चांगल्या खेळपट्टया तयार करण्याच्या अनुशंगाने मुंबई क्रिकेट असो. अध्यक्ष श्री. विजय पाटील यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पूर्व) येथील हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे मैदानावर मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या माध्यमातुन खेळपट्टया तयार करणेकरीता महानगरपालिकेस परवानगीसाठी पत्र दिलेले आहे. सदर पत्रासोबत मा. श्री. प्रताप सरनाईक, सदस्य विधानसभा यांनी पत्र देऊन पाठपूरावा करण्यात येत आहे.

मिरा भाईंदर शहरामध्ये क्रिकेटवर प्रेम करणारे व क्रिकेट खेळणारे अनेक खेळाडु असुन सदरील खेळाडुंकरीता चांगल्या दर्जाच्या खेळपट्टया उपलब्ध नाहीत. सदर खेळाडुंना मुंबईतील शिवाजी पार्क, आझाद मैदान, ओव्हल मैदान अशा मैदानावर जाऊन नेट सराव करावा लागतो. याकामी प्रवासामध्ये खूप वेळ जात असल्याने त्यांना सरावासाठी वेळ फार कमी मिळत असतो. तसेच क्रिकेट विश्वातील माजी कसोटीपट्टु व नामवंत प्रशिक्षक मिरा भाईंदर शहरामध्ये येऊन या खेळाडुंना मार्गदर्शन करु शकतात. त्यामुळे अनेक वर्षापासुन खेळाडु, पालक यांच्याकडुन मिरा भाईंदर मध्ये सरावाकरीता खेळपट्टया तयार करणेबाबत मागणी होत आहे.

भाईंदर (पुर्व) येथे मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेमध्ये आरक्षण क्र.221 "बगीचा" आरक्षणाने आरक्षित आहे. सदरील जागेचे एकूण 16200 चौ.मी. इतके क्षेत्रफळ आहे. विकास आराखड्यामध्ये सदर जागेवर बगीचाचे आरक्षण असले तरी त्याचा पुर्वीपासून मैदान म्हणून वापर सुरु आहे. सदरील जागेचा वापर मैदान म्हणून करायचा झाल्यास सदर आरक्षण विकास योजनेत दर्शविण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव मा. महासभेच्या मान्यतेने शासनाच्या मंजूरीसाठी पाठवावा लागेल.

तसेच भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. 246 हे आरक्षण विकास योजनेत खेळाचे मैदान या आरक्षणाने आरक्षित असून सदरील मैदानाचे एकूण क्षेत्र 20000 चौ.मी. एवढे आहे. सदरील आरक्षण क्र. 246 मैदानातील क्रिकेट पीच व नेट दैनंदिन संचलन देखभाल व दुरुस्तीसाठी मे. ब्राओ क्रिकेट ॲकॅडमी या संस्थेसोबत करारनामा करून देण्यात आलेले आहे. सदरील कामाची मुदत दि.31/12/2021 पर्यंत आहे. सदर आरक्षणाची 21641.68 चौ.मी. जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आहे.

महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत भाईंदर (प.) आरक्षण क्र.91 स्टेडियमसाठी 18 हेक्टर क्षेत्र (मौजे भाईंदर, सर्व्हे क्र.229 पैकी, 230 पैकी) राखीव असून सदर आरक्षणाच्या काही भागावर सुभाषचंद्र बोस मैदान अस्तित्वात आहे. सदरील जागा ही महानगरपालिकेच्या मालकीची नसून सन 2010 मध्ये जिल्हाधिकारी ठाणे यांनी सदर जागा अतिक्रमणापासून संरक्षणासाठी महानगरपालिकेकडे सोपविलेली आहे. सदर जागेच्या मालकीबाबत वाद सुरु असून सॉल्ट विभागाकडे बंधपत्र सादर करुन जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

वरील आरक्षणापैकी मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या माध्यमातुन खेळपट्टया तयार करून अटी व शर्तीनुसार प्रशिक्षण केंद्र सुरु करणेकामी तसेच सदर आरक्षणापैकी एका मैदानाचा ताबा मुंबई क्रिकेट असोसिएशन यांच्याकडे देणेबाबत धोरण निश्चित करणेस शिफारस आहे.

(दिलिप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-10/DK/21-22/MG-7

गोषवारा प्राप्त दि. 24/10/2021 वेळ ११.४५ वा.
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र ४६ वर्ष :- 2021-22

नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.09 /१२/2021**

**बांधकाम विभाग**

**// गोषवारा //**

प्रकरण क्रमांक (६५) :- भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र.11 मधील इंदिरानगर येथील समाजमंदिराचे व व्यायामशाळेचे वाढीव बांधकाम करणेकामाच्या खर्चास प्रशासकीय आर्थिक मान्यता देणे.

भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र.11 मधील इंदिरानगर येथील समाजमंदिर व व्यायामशाळा आहे. सदर समाजमंदिर व व्यायामशाळेची जागा अपुरी पडत असल्याने समाजमंदिर व व्यायामशाळेची वाढीव बांधकाम करण्याची मागणी मा.श्री. प्रविण मो. पाटील (विरोधी पक्षनेता) यांनी केलेली होती. त्या अनुषंगाने साईटची पाहणी करून रु.36,87,650/- रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर कामी सन 2021-22 या आर्थिक वर्षातील विरोधी पक्षनेता स्वेच्छा निधी या लेखाशिर्षा अंतर्गत रु.50.00 लक्ष तरतुद उपलब्ध आहे. तरी सदर कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेस शिफारस आहे.

**कार्यकारी अभियंता (साबां)**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

PC-4/2021-22/CM/G-1

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मिळकत विभाग

### मा. महासभा दि. ७ /१२/2021

### // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (६९) :-** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुख्य रस्त्यावरं पीपीपी (Public Private Partnership) तत्वावर दिशादर्शक फलक उभारणे कामाबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे 78.40 चौ.किमीटर एवढे असुन शहराची लोकसंख्या सुमारे 12 लक्ष एवढी आहे. शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असुन शहरातील वाहतुक व्यवस्थे अंतर्गत रस्ते देखिल मोठया प्रमाणावर बांधण्यात आलेले आहेत. शहरात येणा जाणाऱ्या प्रवशांच्या माहितीसाठी व सुरळीत प्रवासासाठी रस्त्यावर ठिकठिकाणी दिशादर्शक कमानी/फलक हे बसविणे आवश्यक आहे. सद्यास्थितीत खालील प्रमुख रस्त्यावर सदर दिशादर्शक कमानी बांधण्याची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| 1 | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर गोल्डन नेस्ट सर्कल दोन्ही बाजुस |
| 2 | ब्रॅन्ड फॅक्टरी जवळ (दोन्ही बाजुस) |
| 3 | एस.के. स्टोन व सिल्व्हर पार्क मध्ये |
| 4 | एस.के. स्टोन ते कनकिया जक्शंन मध्ये |
| 5 | कनकिया जक्शंन जवळ (दोन्ही बाजुस) |
| 6 | काशिमिरा जक्शंन (दोन्ही बाजुस) |
| 7 | भाईंदर (पु.) गोल्डन नेस्ट रस्त्यावर (दोन्ही बाजुस) |
| 8 | भाईंदर (प.) मॅक्सस मॉल समोरील 45 मीटर रस्ता (दोन्ही बाजुस) |
| 9 | मिरारोड (पुर्व) शांतीपार्क (दोन्ही बाजुस) |
| 10 | मिरारोड (पुर्व) शांती शॉपिंग सेंटर समोरील 30 मीटर रस्ता मासळी मार्केट समोर |
| 11 | मिरारोड (पुर्व) जैन मंदिर (दोन्ही बाजुस) |
| 12 | मिरारोड (पुर्व) अयप्पा मंदिर (दोन्ही बाजुस) |
| 13 | मिरारोड (पुर्व) सृष्टी जक्शंन |
| 14 | मिरारोड (पुर्व) इस्कॉन मंदिर समोर, भक्ती वेदांन्त जक्शंन |
| 15 | मिरा गाव डेल्टा जक्शंन (दोन्ही बाजुस) |
| 16 | भाईंदर (प.) जैन मंदिर मागील रस्ता (दोन्ही बाजुस) |
| 17 | भाईंदर (प.) छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (स्टेशन रोडवर) |
| 18 | घोडबंदर वेस्टर्न हॉटेल जवळील रस्ता, जे.पी. इन्फ्रा जवळ |
| 19 | राष्ट्रीय महामार्ग क्र.08 वर लोढा ॲक्वा (दोन्ही बाजुस) |

| | |
|---|---|
| 20 | राष्ट्रीय महामार्ग क्र.08 अजित पॅलेस 18 मीटर रस्त्यावर |
| 21 | राष्ट्रीय महामार्ग क्र.08 वर दाराज धाबा, साई पॅलेस समोर |

सदर कमानी महानगरपालिकेमार्फत बांधल्यास त्यावर करोडो रुपये खर्च होणार आहे. तथापी विविध शहरात अशा प्रकारे कमानी हया पीपीपी तत्वावर बांधुन घेण्यात आलेल्या आहेत. संबधित संस्था स्वखर्चाने कमानी बांधुन 15 वर्ष मुदती पर्यंत त्यावर जाहिरात करुन कमानी वरील बांधकाम खर्च व देखभाल दुरुस्तीचा खर्च वसुल करुन घेतात. या बाबतचा प्रस्तावाबाबत मा.महासभा दि.20/04/2021 ठराव क्र.07 अन्वये घेतलेल्या निर्णयानुसार सदर कमानी साठी मनपाने काम केल्यास 22.23 कोटी खर्च येईल. मेट्रो 2 उड्डाणपुलाच्या कामामुळे कमानी बाधित होणार नाहीत. सदर कामानी वर जाहिरात कंत्राटदारामार्फत करण्यात येऊन त्या उत्पन्ना मधुन महानगरपालिकेस सदर कमानी बांधकाम व देखभालीचा खर्च काढुन किती उत्पन्न देईल या प्रमाणे निविदा मागविण्यात येणार आहे. तरी सदर माहितीसह शहरात दिशादर्शक कमानी बांधण्यासाठी धोरण निश्चित होणेस शिफारस आहे.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-6/21-22/DK/MG-2

गोषवारा प्राप्त दि. 24/8/2022 वेळ 11.11.00 a.m.
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र. 60 वर्ष :- 2022-22

लि. लिपिक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.०१ /१२ /2021**

**मिळकत विभाग**

**// गोषवारा //**

प्रकरण क्रमांक (६७) :- रस्ते, चौक, वास्तू यांना नावे देणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते, चौक व वास्तु यांचे नामकरण करण्यासाठी खालील प्रमाणे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | ठिकाण | प्रस्तावित नाव |
|---|---|---|
| 1) | पेणकरपाडा आरक्षण क्र.353 (उद्यान) | संत गजानन महाराज उद्यान |
| 2) | घोडबंदर बस डेपो | नाना शंकर शेट बस डेपो |
| 3) | मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.261 (उद्यान) | शिवरत्न वीर जिवाजी महाले उद्यान |
| 4) | शांती गार्डन सेक्टर 5 मधील आरक्षण क्र.336 मधील पार्क | स्व.श्री दिलिप लाड नाना नानी पार्क |
| | | कै. यशवंत केशव भोईर उद्यान |
| 5) | मिरारोड (पु.) आरक्षण क्र.269 (उद्यान) | शहिद मेजर कौस्तुभ राणे उद्यान |
| | | सावित्री बाई ज्योतिराव फुले उद्यान |
| 6) | शांती पार्क गोकुल व्हीलेज रस्ता | श्री. भगवान महावीर स्वामी मार्ग |
| 7) | मिरारोड, राजीव गांधी किडांगणातील रंगमंच | ज्ञानदेव तुकाराम दळवी रंगमंच |
| 8) | जरीमरी तलाव चौक | हिन्दु हृदय सम्राट पृथ्वीराज चौहान चौक |
| 9) | मिरारोड, पुनम सागर, परिवार हॉटेल समोरील चौक | विश्व धरोहर चौक |
| | | भारतरत्न लोहपुरुष सरदार वल्लभाई पटेल चौक |
| 10) | मिरारोड (पु.) आ.क्र.246 मैदान | छत्रपती संभाजी राजे मैदान |
| 11) | मिरारोड (पु.) हाटकेश गौरव संकल्प फेज-2 दुभाजक | हाटकेश्वर महादेव कट्टा (जेष्ठ नागरीक विरंगुळा) |
| 12) | भाईंदर (पु.) आर.एन.पी. पार्क सरोवर इमारत ते बाबाजी पॅलेस पर्यंत | श्री नारायण गुरु रोड |
| 13) | श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील पंजाब फाउड्री बस थांबा | सहयादी नगर बस थांबा |
| 14) | भाईंदर (पु.) सचिन तेंडुलकर मैदानातील रंगमंच | स्व. धर्मवीर आनंद दिघे रंगमंच |
| 15) | गोडदेव गाव, सामाजिक सभागृह | कै. विनायक धर्मण घरत सभागृह |
| 16) | प्लीझंट पार्क खोडीयार कुंज जवळील उद्यान | प्लीझंट पार्क उद्यान |
| 17) | मिरारोड, कनकिया एल.आर.तिवारी इंजिनिअरींग व राहुल इंटरनॅशनल स्कुल मधील रस्ता | श्रीम कांतीदेवी एल. तिवारी मार्ग |
| 18) | रामदेव पार्क, लाईफ लाईन केमिस्ट समोरील चौक | भगवान महावीर चौक |
| 19) | हटकेश, मंगलनगर आरक्षण क्र.305 (उद्यान) | स्वतंत्रता सेनानी मंगल पांडे उद्यान |
| 20) | कनकिया आ.क्र.300, 267 चौक | मॉ भारती चौक |
| 21) | कनकीया चौक (अंतरीक्ष इमारती जवळ) | श्री. शनीधाम चौक |

| | | |
|---|---|---|
| 22) | रामदेव पार्क, सुभाष नगर, भवानी मेडीकल येथील चौक | मैथिल साहित्यकवि विद्यापती चौक |
| 23) | हटकेश, आ.क्र. 314 येथील चौक | भगवान गौतम बुध्द चौक |
| 24) | हटकेश आ.क्र.314 मैदान | भारतरत्न डॉ. बाबसाहेब आंबेडकर मैदान |
| 25) | हटकेश हबटाऊन, गंगासदन चौक | भगवान श्री. परशुराम चौक |
| 26) | आरक्षण क्र.305 चौक | सम्राट अशोक मोर्य चौक |
| 27) | हटकेश अॅव्हेन्यु बिल्डींग ते पुजा पार्क (जॉगर्स पार्क) | भगवान धर्मराज श्री. चित्रगुप्त जॉगर्स पार्क |
| 28) | पेणकरपाडा गाव व गणेश मंदिर रस्ता चौक | मराठा चौक |
| 29) | राई शिवनेरी चौक | कै. श्री. यशवंत मास्तर चौक |
| 30) | राईगांव मैदान येथील नविन व्यासपीठ | संत श्री. बालयोगी सदानंद महाराज व्यासपीठ |
| 31) | मिरारोड (पूर्व) नविन न्यायालय इमारत समोरील रस्ता | कै. दादासाहेब बी पाटील मार्ग उर्फ डी.बी. पाटील मार्ग |
| 32) | आरक्षण क्र.242 मधील श्री. जग वल्लभ सुरीश्वरजी महाराज उद्यानातील योगा केंद्रास | स्वामी विवेकानंद योग केंद्र |
| 33) | सुजाता शॉपिंग सेंटर जंक्शन भाजी मार्केट अशोक भवन बी.पी. रोड अद्योगिक वसहात गल्ली | स्व. चांदमल मितल चौक |
| 34) | राष्ट्रीय महामार्ग क्र.8 नीलकमल नाका, जनता व काशिगांव प्रवेशव्दार | भारत रत्न महामानव व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मार्ग व माता रमाबाई आंबेडकर प्रवेश व्दार |
| 35) | आर.एन.पी.पार्क कृष्णा आंगण इमारतीचे बाजुस असलेले उद्यान | काशी विश्र्वनाथ उद्यान |
| 36) | जनता नगर रस्ता कब्रस्थान समोरील चौक | छत्रपती शिवाजी महाराज चौक |
| 37) | भारतरत्न सचिन तेंडुलकर मैदानातील जॉगींग ट्रॅक | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जॉगींग ट्रॅक |
| 38) | मिरारोड, सॅन्ड स्टोन इमारती जवळ प्रभाग क्र.13 मधील सर्व्हे नं.431 मधील उद्यान | युनिक गार्डन अव्दितीय उद्यान |
| 39) | भाईंदर (प.) स्वामी नारायण मंदीरा जवळील समाज मंदीर | श्री. हरिकृष्ण महाराज सभागृह |
| 40) | भाईंदर (प.) क्रांतीनगर समाज मंदिर | भारतरत्न स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी ग्रंथालय |
| 41) | मिरारोड नयानगर ते शितल नगरकडे जाणाऱ्या रस्त्यावरील चौक | स्व. श्रीमती उमा विश्वनाथ सपार चौक |
| 42) | जनता नगर वुध्द विहार व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोस्कृतिक कैंद्र | धम्म सम्राट अशोक वुध्द विहार |
| 43) | भाईंदर (प.) सेवालाल चौक ते सॉलिटीअर इमारत रस्ता | स्व. वजुभाई वृंदावनदास व्होरा मार्ग |
| 44) | भाईंदर (प.) गणेश आनंद नगर येथील उद्यान | गणेश आनंद क्रांती नगर उद्यान |
| 45) | मिरारोड (पूर्व) बालाजी हॉटेल स्कायलॅन्ड कॉम्पलेक्सच्या बाजूचे नियोजित जेष्ठ नागरीक विरंगुळा केंद्र | स्व. यशवंत भोईर विरंगुळा केंद्र |

| | | |
|---|---|---|
| 46) | एस.के.स्टोन ते पुनम गार्डन रस्ता युनिक हाईट्स चौक | स्व. सिताराम सिह साधु चौक |
| 47) | उत्तन भुतबंगला चौक | बॅरिस्टर काका बॅप्टिस्टा चौक |
| 48) | राष्ट्रीय महामार्ग क्र.08 वरून पेणकरपाडा कडे जाणाऱ्या रस्त्यावरील प्रवेशव्दार | कै. पदमाकर म्हात्रे प्रवेशव्दार |
| 49) | पेणकरपाडा येथील अग्निशमन केंद्र | डॉ. रामराव महाराज अग्निशमन केंद्र |

वरील प्रस्तावांबाबत विचार विनिमय होऊन अंतिम निर्णय होणेस शिफारस आहे.

**(दिलीप ढोले)**
**आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-4/2021-22/DK/MG-3

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

### मा. महासभा दि.७ /१२/२०२१

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रमांक (६८)** :- मिरा-भाईंदर महापगरपालिका क्षेत्रातील मौजे.उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी पोकलेन, चेन डोझर, मजुर पुरवठा करणे कामासाठी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे उत्तन येथील घनकचरा प्रकल्प ठिकाणी शहरातील दररोज 520 ते 550 मेट्रीक टन कचरा जमा होत असतो. त्यापैकी दररोज 350 मेट्रीक टन कचऱ्यावर नविन प्रकल्पा ठिकाणी प्रक्रीया होते. तसेच उर्वरीत मिक्स कचरा हा टाकून सपाटीकरण करण्यात येते. सदर कचरा टप्या टप्याने कमी होणार आहे. सदर सर्व कार्यवाही करीता पोकलन, चेन डोझर, मजूर इ. पूरवठा करून घ्यावा लागतो. सदर कामे ही कंत्राटदारा मार्फत मशिनरी पूरवठा करून घेऊन करावी लागतात. सदर कामासाठी रू.1,62,06,930/- वर्षिक एवढा खर्च येऊ शकेल. तसेच सर्व कामांसाठी निविदा मागवून दर निश्चित करावयाचे आहेत. सदर खर्चासाठी अर्थ संकल्पात वेळोवेळी तरतुद करण्यात येत असते. तरी सदर खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-20/PP/2021-22/PP/MG-1

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

मा. महासभा दि. १/१२/२०२१

## // गोषवारा //

प्रकरण क्र. ( ६८ ) :- आर्थिक व प्रशासकिय मंजूरी मिळणेबाबत (पाणी पुरवठा विभाग)

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पुर्व) जेसल पार्क येथील मलनि:स्सारण केंद्र जवळपास 30 ते 35 वर्षे जुने असल्याने अत्यंत जर्जर अवस्थेत आहे. त्याकरीता सदर मलनि:सारण केंद्राची दुरुस्ती व इतर अनुषंगिक कामे करणे आवश्यक आहे.

मिरारोड (पुर्व) काशिगांव येथील क्लासिक कंम्पाऊंड ते आर्च पुजा पार्क पर्यंतच्या परिसरातील इमारतींना कमी दाबाने व कमी प्रमाणात पाणी पुरवठा होत असल्याने सदर ठिकाणी पाणी पुरवठयात सुधारणा होणेकरीता नविन वाढीव व्यासाची जलवाहिनी अंथरणे आवश्यक आहे.

तसेच मिरा-भाईंदर शहरास पाणी पुरवठा करणारी साकेत ते पातलीपाडा पर्यंतची 1590 मि.मी. व्यासाची व पातलीपाडा ते हाटकेश पर्यंतची 1350 मि.मी. व्यासाची जलवाहिनीची वार्षिक देखभाल, दुरुस्ती व परिचलन काम करणे आवश्यक आहे.

उपरोक्त कामांची खालीलप्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित खर्च (रु.) |
|---|---|---|
| 1. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पुर्व) येथील जेसल पार्क मलनि:स्सारण केंद्राच्या दुरुस्ती व इतर अनुषंगिक कामे करणे. | रु. 1,97,65,000/- |
| 2. | मिरारोड (पुर्व), काशिगांव येथील क्लासिक कंम्पाऊंड ते आर्च पुजा पार्क पर्यंत डी.आय. जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु. 46,76,200/- |
| 3. | साकेत ते हटकेश पर्यंतची फिडरमेन जलवाहिनीची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे. | रु. 1,24,45,000/- |

वरील कामे अत्यावश्यक असल्याने मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेकरीता सदर प्रस्ताव मा. महासभेत ठेवण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

E:\Rane\Goshwara\2021-22\Goshwara - Mahasabha - Arithak & Prashasakiya Majuri.doc